# Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad

## University Placement Cell & Employment Office

## Jointly arranged “Summer Job Fair” – A Report

| | | |
|---|---|---|
| Event Name | - | Summer Job Fair |
| Date | - | 9th and 10th June 2015 |
| Time | - | 10: 00 AM to 06:00 PM |
| Venue | - | University Auditorium |
| Student Participants | - | - All Graduate & Post Graduate students. (Few companies - SSC & HSC)<br>- 1700 Students registered for Job Fair from various colleges and University departments.<br>- 602 students got selected for final round at company office. (Details are attached herewith on separate sheet) |
| Employer Participants | | - 15 companies from various sector participated in the Job Fair (Details are attached herewith on separate sheet) |

Photos of Summer Job Fair (Soft Copies are sent by email)



Students registration Counters



Employer Address to students




Placement Officer explaining the process




Director BCUD welcoming Employers

List of Companies participated in Job Fair and their selection

| Sr. No. | Name of Company | Required Students | Selection for final Interview |
|---|---|---|---|
| 1 | TCS (BPS Services) | BA, B.Com, BBA, B.Sc(General Excluding CS & IT Specialization)<br>All Graduate Students Passing out in 2015 (Except IT Specialization students) | 6 |
| 2 | Vastu Services & Solutions Pvt. Ltd. | Any Graduate / Post Graduate (Willing to work in Financial Marketing & Sales Filed) | 114 |
| 3 | Nascency InfoTech Pvt. Ltd. | BBA, MBA, B.Com, M.Com(Interested students for IT Marketing) | 35 |
| 4 | Wipro Ltd. (Switches Division) | Any Graduate / Post Graduate<br>(BBA or MBA Preferred) Fresh or Experienced. | 8 |
| 5 | Jyotiba Technologies | B.Sc. for QA & Production Associate<br>B.E. (Mech) for New Product Introduction<br>B.Com for Commercial | 15 |
| 6 | Harman Finochem ltd. | B.Sc. Chemistry Fresher or Max 2Yrs. Exp. | 50 |
| 7 | ICICI Bank | Any Graduation | 100 |
| 8 | Kotak Mahindra Bank | Any Graduation / MBA | |
| 9 | ING (New Kotak) | Any Graduation / MBA | |
| 10 | Baxter Ltd. | SSC / HSC / Any Graduate | 60 |
| 11 | Parkins India Pvt. Ltd. | Any Graduate / Diploma – Mechanical | 10 |
| 12 | Dhoot Transmission Pvt. Ltd. | HSC / Any Graduate – Female only | 100 |
| 13 | Rubicon Formulation Pvt. Ltd. | HSC / B.Sc Chemistry, | 80 |
| 14 | Endress Houser Pvt. Ltd. | B.Com, B.Sc, Diploma – Electrical | 8 |
| 15 | NRB ltd. | B.Sc., Any graduate | 16 |
| | | Total | 602 |

## NEWS Coverage to the Summer Job Fair

Paper – Maharashtra Times Date 7/6/2015 Day – Sunday

maharashtratimes.com

रविवार महाराष्ट्र टाइम्स

औरंगाबाद, ७ जून २०१५ ◆ पाने १६ + संवाद ◆ शहर आवृत्ती ◆ रुपये ३.०० संवाद

**लेटलतिफांना दंड** महापौरांनी वॉर्ड कार्यालयातील काही लेटलतिफांना ५०० रुपयांचा दंड ठोठावला. p2

**टोलमुक्तीचे समाधान** टोलमुक्तीमुळे आर्थिक जोखडातून मुक्त झाल्याची नागरिकांची भावना आहे. p6

**अन्न 'सुरक्षा' अपुरीच**

# रोजगाराची संधी आली तुमच्या दारी!

**म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद**



मटा गुड न्यूज

सुशिक्षित बेरोजगारांसाठी एक गुड न्यूज. बुधवारी (१० जून) रोजगार मेळाव्यातून विविध नामांकित कंपन्यांमध्ये ३२६ जागी उमेदवारांना नोकरीची संधी मिळणार आहे.

रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेल विभागातर्फे या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठ परिसरातील सेंट्रल ऑडीटोरियम येथे सकाळी दहापासून रोजगार मेळाव्यास सुरुवात होईल. रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी www.maharojgar.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांनी नोंदणी करून सहभाग पत्र प्राप्त करून घ्यावे. अधिक माहितीसाठी जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, मालजीपुरा, स्टेशन रोड येथे संपर्क साधवा, असे आवाहन केंद्राचे सहायक संचालक विजय रिसे केले आहे.

| उद्योजकांचे नाव | पदनाम व संख्या | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| वस्तू सर्व्हिसेस अ‍ॅण्ड सोल्युशन | सेल, मार्केटिग -२५ | पदवीधर, पदव्युत्तर |
| वस्तू सर्व्हिसेस अ‍ॅण्ड सोल्युशन | ट्रेनी -२५ | पदवीधर, पदव्युत्तर |
| नेसेन्सी इंफो. टेक्नो | ट्रेनी -१५ | बीबीए, एमबीए, बी.कॉम. एम. कॉम |
| विप्रो लि. स्विचेस विभाग | ट्रेनी -२ | कोणत्याही शाखेचा पदवीधर |
| भारती एअरटेल | ट्रेनी -५ | बी. ई २०१५मध्ये उत्तीर्ण किंवा दोन वर्षाचा अनुभव. |
| ज्योतिबा टेक्नॉलॉजीस | ट्रेनी -६ | बी.एस्सी, क्वॉलिटी कन्ट्रोल, बी.ई मेकॅनिक, बी. कॉम. |
| हरमन फिक्नो | ट्रेनी -२० | बी.एस्सी केमिस्ट्री आणि दोन वर्षांचा अनुभव |
| कोटक महिंद्रा बँक इंग्नो (न्यु कोटक) यांचा ग्रुप | ट्रेनी -५० | पदवीधर, एमबीए |
| इंन्डुर हौसर फ्लोटक इंडिया | ट्रेनी -१३ | १० वी, आयटीआय, बी. कॉम. |
| धूत ट्रान्समिशन | ट्रेनी (महिला) - १०० | १० वी, १२वी |
| रुबीकॉन फॉर्मास्टिकल्स | ट्रेनी -५० | १० वी , १२ वी |
| पॅर्कीन्स इंडिया कंपनी | टीम मेंबर -१५ | डिप्लोमा इन मेकॅनिक |

Paper – Maharashtra Times Date 10/6/2015 Day – Wednesday

महाराष्ट्र टाइम्स

औरंगाबाद Times of India

ADVERTORIAL, ENTERTAINMENT PROMOTIONAL FEATURE औरंगाबाद, बुधवार, १० जून २०१५

महाराष्ट्र टाइम्स, औरंगाबाद ■ बुधवार, १० जून २०१५ औरंगाबाद

# जिल्ह्यातील सव्वा लाख युवकांना नोकरीची प्रतीक्षा

**म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद**



जिल्ह्यात सध्या सव्वा लाख युवक नोकरीच्या प्रतिक्षेत आहेत. यात इंजिनीअरिंगचे शिक्षण घेतलेले सव्वा दोन हजार, तर पदवीधर आणि पदव्युत्तर शिक्षण झालेले २५ हजारांहून अधिक तरुण आहेत. महिनाभरात ७१४ जणांनी पुन्हा नव्याने रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्रात नोकरी मिळावी म्हणून नोंदणी केली आहे.

शेंद्रा, चिकलठाणा, वाळूज आदी औद्योगिक क्षेत्र असतानाही जिल्ह्यातील भूमीपुत्रांना नोकरीसाठी वणवण फिरावे लागते. जागतिकीकरणाचा परिणाम छोट्या उद्योगधंद्यावर होत आहे. त्यात कंत्राटी पद्धतीमुळे कायमस्वरुपी रोजगारांच्या संधी हिरावून घेतल्या जात आहेत. त्यामुळे जागा कमी आणि उमेदवार जास्त असे चित्र अनेक नोकरी भरतीवेळी समोर येते.

**....यांना हवा रोजगार!**

| | |
|---|---|
| एकूण बेरोजगार | - १ लाख २८ हजार ७९५ |
| अभियांत्रिकीच्या पदवीधर | - २ हजार १४१ |
| पदव्युत्तर | - ११० |
| वैद्यकीय अभ्यासक्रमधारक | - १४० |
| कला शाखेचे पदवीधर | - १५ हजार |
| विज्ञान शाखेचे पदवीधर | - ५ हजार ७८८ |
| वाणिज्य शाखेचे पदवीधर | - ३ हजार ३४९ |
| विविध डिप्लोमाधारक | - २ हजार १७२ |
| अभियांत्रिकीधारक | - २ हजार २९५ |
| डी. एड व अन्य पदविका | - ४ हजार ०४६ |
| व्यवस्थापन अभ्यासक्र | - ६४० |
| कायदे पदवीधारक | - १२४ |
| १०वी पास | - ४० हजार ८७० |



www.maharojgar.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करता येते. रोजगार मेळाव्यातून गेल्या वर्षी ८७० जणांना रोजगार मिळाला. रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमअंतर्गत १ हजार ९२५ जणांना लाभ मिळाला.

**- वि. रा. रिसे, सहायक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र.**

## आज रोजगार मेळावा

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगारांना नोकरीची संधी मिळावी यासाठी जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठच्या प्लेसमेंट सेल विभागातर्फे बुधवारी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठ परिसरातील सेंट्रल ऑडिटोरियम येथे सकाळी दहापासून या मेळाव्यास सुरुवात होईल. ट्रेनी, वितरण, मार्केटिंग, टिम मेंबर अशा विविध पदाच्या ३२६ जागा या मेळाव्याच्या माध्यमातून भरण्यात येणार आहेत. यात नेसेन्सी इंफो टेक्नो, ज्योतिबा टेक्नॉलॉजी, आयसीआयसीआय, कोटक महिंद्रा, इंग्नो आदी नामांकित कंपन्याचे प्रतिनिधी उमेदवारांच्या मुलाखती घेऊन त्यांची निवड करतील.

Paper – Sakal	Date 7/6/2015	Day – Sunday

औरंगाबाद, रविवार, ७ जून २०१५ । किंमत ₹ चार

सकाळ

७ जून विशेष

चला, पेर

पुणे । कोल्हापूर । नाशिक । मुंबई ।

# बेरोजगारांना बुधवारी सुवर्णसंधी

## रोजगार केंद्र, विद्यापीठातर्फे मेळावा

**सकाळ वृत्तसेवा**

औरंगाबाद, ता. ६ : जिल्हा रोजगार आणि स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेल विभागातर्फे बुधवारी (ता. दहा) रोजगार मेळावा होणार असल्याची माहिती जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार सहायक संचालक विजय रिसे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### नोंदणी करा, मुलाखतीला या...

विद्यापीठातील कुलगुरूंच्या बंगल्याशेजारील विद्यापीठाच्या सभागृहात सकाळी साडेदहापासून मुलाखतींना सुरवात होईल. नोंदणीकृत विद्यार्थ्यांना मेळाव्यास उपस्थित राहता येईल. त्याशिवाय उमेदवारांनी www.maharojgar.gov.in संकेतस्थळावरून ऑनलाइन सहभाग पत्र घेणे आवश्यक आहे किंवा एम्प्लॉयमेंट कार्ड, बायोडाटासह मुलाखतीला येण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. रोजगार मेळाव्यात १४ कंपन्या येणार असून त्याद्वारे ३२६ उमेदवारांना संधी आहे. विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेलकडे आतापर्यंत ६०० विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केल्याचे प्लेसमेंट ऑफिसर गिरीश काळे यांनी सांगितले; तर निवड होणाऱ्या उमेदवारांना साडेसहा हजारांपासून स्टायफंड मिळू शकतो, असे वि. का. भुसारे यांनी सांगितले.

### अशा आहेत संधी...

- रोजगार मेळाव्यात वस्तू सर्व्हिसेस अॅण्ड सोल्यूशन कंपनीत पदवी आणि पदव्युत्तर उमेदवारांसाठी सेल्स आणि मार्केटिंगमध्ये एक्झिक्युटिव्ह आणि ट्रेनीची प्रत्येकी २५ पदे भरायची आहेत.
- नेसेन्सी इन्फो. टेक्नो कंपनीत बीबीए, एमबीए, बी. कॉम., एम. कॉम.च्या उमेदवारांसाठी १५ जागा आहेत.
- विप्रोच्या स्विचेस विभागात कोणत्याही शाखेच्या पदवीधर दोन जागा भरायच्या आहेत.
- भारती एअरटेल बीई किंवा दोन वर्षांचा अनुभव असलेल्या पाच उमेदवारांना घेणार आहे.
- ज्योतिबा टेक्नॉलॉजीतर्फे सहा प्रशिक्षणार्थी, आयसीआयसीआय बँक, कोटक महिंद्रा बँक, इंग्नो (न्यू कोटक) यांचा ग्रुप ५० प्रशिक्षणार्थी घेणार असून त्यासाठी कोणत्याही शाखेच्या पदवीची अट असून एमबीए शाखेच्या उमेदवारांना प्राधान्य असेल.
- इंन्डुर हौसर फ्लोटक इंडियात १३ प्रशिक्षणार्थींना संधी मिळणार असून दहावी, आयटीआय, बी. कॉम.च्या उमेदवारांना प्राधान्य राहील.
- धूत ट्रान्समिशनच्या फारोळा आणि शेंद्रा एमआयडीसीत दहावी, बारावी उत्तीर्ण प्रत्येकी ५० महिलांना प्रशिक्षणार्थी म्हणून संधी आहे.
- स्वोकॉनमध्ये दहावी, बारावीचे ५० प्रशिक्षणार्थी भरणार असून पर्किन्स इंडिया कंपनीतही यंत्र अभियांत्रिकी पदविकेच्या १५ जागा उपलब्ध आहेत.

Paper – Maharashtra Times Date 11/6/2015 Day – Thursday

maharashtratimes.com | www.mtonline.in

# महाराष्ट्र टाइम्स

औरंगाबाद, गुरुवार, ११ जून २०१५ ◆ पाने २० (औरंगाबाद टाइम्स ऑफ इंडियासह) ◆ शहर आवृत्ती ◆ रुपये २.५० औरंगाबाद Times सह


# ९० जणांना नोकरी मिळाली!

## रोजगार मेळाव्यातील तीन हजारांपैकी ५५० उमेदवारांची अंतिम मुलाखतीसाठी निवड

**म. टा. प्रतिनिधी, औरंगाबाद**

विद्यापीठातील रोजगार मेळाव्यात बुधवारी ९० जणांना नोकरी मिळाली, तर ५५० उमेदवारांची अंतिम मुलाखतीसाठी निवड झाली. जवळपास तीन हजार युवकांनी या मेळाव्यात मुलाखत देण्यासाठी गर्दी केली.

जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्र आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठच्या प्लेसमेंट सेल विभागातर्फे या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठ परिसरातील सेंट्रल ऑडिटोरियम येथे हा मेळावा झाला. उद्योजकांच्या मागणीनुसार उमेदवार हा एसएससी, एचएससी, बीएस्सी, क्वॉलिटी कन्ट्रोल, आयटीआय, डिप्लोमा इन मॅकेनिकल, पदवीधर-पदव्युत्तर, बी.ई, एमबीए, बीबीए पास असावा, अशी अट होती. मेळाव्याची नियोजित वेळ सकाळी दहाची होती, पण त्यापूर्वीच मूळ कागदपत्रे, बायोडाटासह जिल्ह्याभरातून आलेल्या उमेदवारांनी विद्यापीठात गर्दी केली होती. मुलाखतीसाठी कंपनीनिहाय स्वतंत्र व्यवस्था केली होती. ९० हून अधिक उमेदवारांना नोकरीची संधी मिळाली असून, सुमारे ५५० हून अधिक उमेदवारांना अंतिम निवडीसाठी आणि पॅकेजसंदर्भात चर्चा करण्यासाठी कंपनीत बोलण्यात आले आहे, अशी माहिती केंद्राचे सहायक संचालक विजय रिसे यांनी दिली.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील रोजगार मेळाव्यात जवळपास तीन हजार युवकांनी मुलाखतीसाठी गर्दी केली.

### या कंपन्यामध्ये नोकरीची संधी

वस्तू सर्व्हिसेस अॅण्ड सोल्युशन, नेसेन्सी इंफो. टेक्नो, विप्रो लि. स्विचेस विभाग, ज्योतिबा टेक्नॉलॉजीस, हरमन फिक्नो, आयसीआयसीआय बँक, कोटक महिंद्रा, एंड्रेस हाऊजर, फ्लोटक इंडिया, धूत ट्रान्समिशन फारोळा, धूत ट्रान्समिशन शेंद्रा, रुबीकॉन फॉर्म्युलेशन, एनआरबी.

### आज निवड

- सकाळी दहापूर्वीची विद्यार्थ्यांची हजेरी.
- तीन हजार युवकांची मुलाखतीसाठी गर्दी.
- अंतिम निवड, पॅकेजसंबंधी गुरुवारी चर्चा.



मेळांव्यास मोठा प्रतिसाद मिळाला. उद्योजकांना विभागांतर्गत उमेदवार घेण्यासाठी उद्युक्त करणे व त्याव्दारे युवकांचा सामाजिकस्तर वाढविण्याचा प्रयत्न सुरू आहे.

- एस. डी. सौदाणे, उपसंचालक, रोजगार व स्वंयरोजगार.



एमबीए पास झाले आहे. चांगल्या नोकरीच्या शोधात होते. या ठिकाणी मुलाखत दिली. चांगली ऑफर मिळाली. अशा मेळाव्यातून तरुणाईला फायदा होतो.

- स्वाती शिर्के, उमेदवार



बी.ए.झाले आहे. विविध कंपन्यात नोकरीची संधी आहे किंवा नाही हे समजत नाही. थेट गेल्यास प्रवेशही मिळत नाही. या मेळाव्याने एक संधी मिळाली. नोकरी मिळेल वाटते.

- सुज्ञा कुलकर्णी, उमेदवार



शिक्षण व पात्रतेनुसार पगार मिळावा, ही अपेक्षा करणे चुकीचे नाही ना. मी एमबीए पास झालो आहे. याठिकाणी संबंधित कंपनीने चांगली ऑफर देत मला निवडले आहे.

- अविनाश सिल्लोडकर, उमेदवार.



आम्ही केवळ नोकरी देत नाही. करिअर घडविण्याची संधी देतो. या मेळाव्याच्या माध्यमातून चांगले उमेदवार, तर उमेदवारांना संबंधित कंपन्यापर्यंत जाण्याची संधी मिळाली.

- कुशाग्र पटेल, प्रतिनिधी, एनआरबी कंपनी.

Paper – Sakal Date 11/6/2015 Day – Thursday

औरंगाबाद, गुरुवार, ११ जून २०१५ । किंमत ₹ तीन

सकाळ


# कॅम्पसमध्ये सहाशे जणांची अंतिम मुलाखतीसाठी निवड

## विद्यापीठात दीड हजार पदवीधरांची उपस्थिती; १४ कंपन्यांचा सहभाग

सकाळ वृत्तसेवा

**औरंगाबाद, ता.१० :** नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभीच विद्यापीठात घेतलेल्या करिअर मेळाव्यास पदवीधरांनी मोठी गर्दी केली होती. दिवसभर चाललेल्या या मेळाव्यात तब्बल दीड हजार बेरोजगारांनी हजेरी लावली. यातील सहाशे जणांची निवड अंतिम मुलाखतीसाठी झाली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व रोजगार कार्यालय यांच्यातर्फे बुधवारी (ता. दहा) हा मेळावा झाला. नाट्यगृहात सकाळी अकरा वाजता बीसीयुडीचे संचालक प्रा. के. व्ही. काळे, उपसंचालक सुनील सैंदाणे, सहायक संचालक विजय रासे यांच्या हस्ते मेळाव्याचे उद्घाटन झाले. प्लेसमेंट ऑफिसर गिरीश काळे यांची प्रमुख उपस्थिती होती. सकाळी नऊपासूनच पदवीधरांनी गर्दी केली होती. बी. ए., बी.कॉम., बी.एस्सी. सह पदविका प्राप्त विद्यार्थी उपस्थित होते. मेळाव्यात वास्तू सर्व्हिसेस, नेसेन्सी इन्फोटेक, विप्रो, ज्योतिबा टेक्नॉलॉजी, हार्मोन फिनोकेम, आयसीआयसीआय बँक, कोटक महिंद्र बँक, आयएनजी, एंड्रेस अॅन्ड हाऊजर, धूत ट्रान्समिशन, रुबीकॉन, पर्किन्स, एनआरबी, बक्स्तर इंडिया आदी कंपन्या सहभागी झाल्या. निवडलेल्या सहाशे पदवीधरांची निवड उत्कृष्ट संभाषण व व्यक्तिमत्त्व हे मुख्य निकष अंतिम निवडीकरिता असतील. मेळाव्यासाठी गिरीश काळे, सुरेश वराडे, देवीदास मिसाळ, भुजंग रिठे, सुरेश शेळके यांनी परिश्रम घेतले.



**औरंगाबाद :** बुधवारी विद्यापीठात घेण्यात आलेल्या कॅम्पस् मुलाखती विद्यार्थ्यांच्या लागलेल्या रांगा.

Paper – Lokmat Date 11/6/2015 Day - Thursday

लोकमत हॅलो औरंगाबाद

औरंगाबाद, गुरुवार, दि. ११ जून २०१५

**दीड हजार तरुण :** रोजगार मेळाव्यात १४ कंपन्यांचा सहभाग

# नोकरीसाठी विद्यापीठात तोबा गर्दी

**औरंगाबाद :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा प्लेसमेंट सेल आणि जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी विद्यापीठात आयोजित केलेल्या रोजगार मेळाव्याला तरुणांची प्रचंड गर्दी उसळली. १४ कंपन्या सहभागी झालेल्या या मेळाव्यात सुमारे सहाशे तरुणांची अंतिम मुलाखतीसाठी निवड करण्यात आली.

औरंगाबाद शहराच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या मार्केटिंग, तांत्रिक सेवा, बँकिंग, इलेक्ट्रिकल आदी कंपन्यांमध्ये काही थेट नोकरीची व प्रशिक्षणार्थी म्हणून अनेक पदांसाठी विद्यापीठाच्या नाट्यगृहात मेळावा घेण्यात आला. मेळाव्यासाठी सकाळी १० वाजेपासूनच विद्यार्थ्यांची गर्दी जमली. विविध कंपन्यांतर्फे ३२१ जागांसाठी मुलाखती घेण्यात आल्या. यामध्ये अनेक मुले आणि मुलींना संधी मिळाली. दहावी उत्तीर्ण ते पदव्युत्तर उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांनी मुलाखती दिल्या. सुमारे दीड हजार विद्यार्थी मेळाव्यात सहभागी झाले. या मुलाखतींसाठी विद्यापीठ आणि महाविद्यालय विकास मंडळाचे संचालक डॉ. के. व्ही. काळे, प्लेसमेंट ऑफिसर गिरीश काळे, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे सहायक संचालक विजय रिसे, वि. का. भुसारे यांची उपस्थिती होती. सुरेश वराडे, देवीदास मिसाळ, भुजंग रिठे, सुरेश शेळके आदींनी सहकार्य केले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्लेसमेंट सेल आणि जिल्हा रोजगार आणि स्वयंरोजगार विभागातर्फे आयोजित रोजगार मेळाव्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रचंड गर्दी केली होती.